# एनसीसी रिपोर्ट 2018-19

## 21 जून 2018 आंतरराष्ट्रीय योग दिवस

21 जून 2018 ला श्री शिवाजी विद्यालय चिखली येथे चिखली शहरातील सर्व एनसीसी युनिट मिळून हा योग दिवस साजरा करण्यात आला. 13 महाराष्ट्र बटालियन एनसीसी खामगाव यांच्या आदेशानुसार चिखली येथील एसपीएम महाविद्यालय, श्री शिवाजी महाविद्यालय व श्री शिवाजी विद्यालय अशा तीनही युनिट मिळून आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करावा अशा सूचना प्राप्त झाल्या होत्या. या सूचनेनुसार 21 जून 2018 ला श्री शिवाजी विद्यालय चिखली येथे चिखली शहरातील तीनही एनसीसी युनिटने विविध प्रकारचे योग अभ्यास करून हा दिवस साजरा केला. या योग दिवसासाठी श्री शिवाजी विद्यालयाचे एनसीसी ऑफिसर प्रकाश चौथे यांनी विविध प्रकारचे योग प्रात्यक्षिके करून दाखवली व ती विद्यार्थ्यांकडून करून सुद्धा घेतली. या कार्यक्रमासाठी एसपीएम महाविद्यालयाचे एनसीसी ऑफिसर लेफ्टनंट शरद रावे तसेच श्री शिवाजी कला व विज्ञान महाविद्यालयाचे एनसीसी ऑफिसर लेफ्टनंट सावळे सर हे सुद्धा हजर होते. या कार्यक्रमासाठी 13 महाराष्ट्र बटालियन एनसीसी खामगावचे जेसीओ प्रदीप चव्हाण हे हजर होते.

## 21st June 2018 International Yoga Day

This Yoga Day was celebrated on 21st June 2018 at Shree Shivaji Vidyalaya Chikhali with all the NCC units of Chikhali city. According to the orders of 13 Maharashtra Battalion NCC Khamgaon, instructions were received that all the three units namely SPM College, Sri Shivaji College and Sri Shivaji Vidyalaya at Chikhali should celebrate the International Day of Yoga together. According to this instruction, on 21st June 2018 at Shree Shivaji Vidyalaya Chikhli, all the three NCC units of Chikhli city celebrated this day by practicing different types of yoga. For this Yoga Day, NCC Officer of Sri Shivaji Vidyalaya, Prakash Chouthe, demonstrated various types of yoga and also got it done by the students. NCC Officer of SPM College Lt. Sharad Rave and NCC Officer of Shree Shivaji College of Arts and Sciences Lt.D.R. Savale were also present for this program. JCO Pradeep Chavan of 13 Maharashtra Battalion NCC Khamgaon was present for this event.

# वृक्षारोपण कार्यक्रम

दिनांक 9 जुलै 2018 ला महाविद्यालयातील एनएसएस युनिट व एनसीसी युनिट यांच्या संयुक्त विद्यमानाने पळसखेड सपकाळ येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी पळसखेड सपकाळ आश्रमाचे हरिदास महाराज यांच्या हस्ते पन्नास झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी एनएसएस विभागाचे प्रमुख प्राध्यापक डॉक्टर सुभाष राऊत व प्राध्यापक विजय वाकोडे हे हजर होते. याप्रसंगी पळसखेड सपकाळ आश्रमाच्या परिसरात झाडांसाठी खड्डे खोदून त्यामध्ये झाडांचे व्यवस्थित रोपण व्हावे यासाठी एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी विशेष मेहनत घेतली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर अभय तारे तसेच संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष रामकृष्ण दादा शेटे संस्थेचे सन्माननीय सचिव प्रेमराजजी भाला यांनी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वृंद व एनएसएस तसेच एनसीसी चे विद्यार्थी हे हजर होते.

# Tree Plantation Programme

On July 9, 2018, a tree plantation program was held at Palaskhed Sapkal in association with NSS unit and NCC unit of the college. Fifty trees were planted by Haridas Maharaj of Palaskhed Sapkal Ashram on this occasion. Dr. Subhash Raut, Head Professor of NSS Department and Professor Vijay Wakode were present on this occasion. On this occasion, the students of NCC worked hard to dig holes for trees in the area of Palaskhed Sapkal Ashram and plant them properly. Dr. Abhay Tare, Principal of the College and Honorable President of the Institute Ramakrishna Dada Shete,Premrajji Bhala, Honorable Secretary of the Institute, congratulated the program. All the faculty members of the college and students of NSS and NCC were present on this occasion.

# स्वच्छता पंधरवडा अंतर्गत ‘स्वच्छता अभियान’

दिनांक 11 सप्टेंबर ते 25 सप्टेंबर 2018 हा स्वच्छता पंधरवाडा म्हणून 13 महाराष्ट्र बटालियन एनसीसी खामगाव च्या वतीने साजरा करण्यात आला. या पंधरवड्यामध्ये विविध महाविद्यालयांनी वेगवेगळे कार्यक्रम साजरे करून हा पंधरवडा साजरा केला. या पंधरवड्या दरम्यान एसपीएम महाविद्यालयाने दिनांक 23 सप्टेंबर 2018 रोजी महाविद्यालय तसेच महाविद्यालयाबाहेरील परिसर स्वच्छ करून या पंधरवड्यामध्ये आपला सहभाग नोंदवला. या स्वच्छता अभियानाच्या कार्यक्रमासाठी शिक्षण प्रसारक मंडळ चिखलीचे सन्माननीय अध्यक्ष रामकृष्ण दादा शेटे, सन्माननिय सचिव प्रेमराजजी भाला, सन्माननिय कोषाध्यक्ष कैलासजी शेटे व सन्माननीय संचालक रामदासजी निमावत हे हजर होते. या कार्यक्रमाप्रसंगी वरील सर्व सन्माननीय पदाधिकाऱ्यांनी स्वच्छता अभियानात प्रत्यक्ष सहभाग नोंदवला. या अभियानामध्ये महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व एनसीसी युनिट चे सर्व विद्यार्थी हजर होते. या कार्यक्रमासाठी 13 महाराष्ट्र बटालियन एनसीसी खामगावच्या कमांडिंग ऑफिसर कर्नल समीर चौधरी यांचे मार्गदर्शन मिळाले.या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन एनसीसी ऑफिसर लेफ्ट शरद रावे यांनी केले होते.

# ‘Swachhta Abhiyan’ under Cleanliness fortnight

11th September to 25th September 2018 was observed as Swachhta Fortnight on behalf of 13 Maharashtra Battalion NCC Khamgaon. In this fortnight, various colleges celebrated this fortnight by celebrating different programs. During this fortnight, SPM College registered its participation in this fortnight by cleaning the college and the premises outside the college on 23 September 2018. Honorable President Ramakrishna Dada Shete, Honorable Secretary Premrajji Bhala, Honorable Treasurer Kailasji Shete and Honorable Director Ramdasji Nimawat were present for the program of this cleanliness campaign. On the occasion of this program, all the above honorable office bearers directly participated in the cleanliness drive. All the professors, non-teaching staff and students of NCC unit of the college were present in this campaign. Commanding Officer of 13 Maharashtra Battalion NCC Khamgaon Colonel Sameer Chaudhary was guided for this program. This program was organized and planned by NCC Officer Lt Sharad Rave. Officer of 13 Maharashtra Battalion NCC Khamgaon Colonel Sameer Chaudhary was guided for this program. This program was organized and planned by NCC Officer Lt Sharad Rave.

## ‘सेना दिवस रॅली’ 15 जानेवारी 2018

दिनांक 15 जानेवारी 2018 रोजी एसपीएम महाविद्यालय मध्ये सेना दिवस रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. 13 महाराष्ट्र बटालियन एनसीसी खामगाव यांच्या मार्गदर्शनातून दरवर्षी 15 जानेवारी हा सेना दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. यावर्षी सेना दिवसानिमित्त 13 महाराष्ट्र बटालियन एनसीसी खामगाव यांनी एका रॅलीचे आयोजन करण्याचे सांगितले होते. त्या सूचनेनुसार एसपीएम महाविद्यालयाच्या एनसीसी युनिटने एसपीएम महाविद्यालय ते श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळा या मार्गावर सेना रॅलीचे आयोजन केले होते. या रॅलीसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी तसेच एनसीसी युनिटचे सर्व कॅडेट्स व महाविद्यालयाचे इतर विद्यार्थी सुद्धा हजर होते. या रॅलीसाठी महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या या रॅलीचे आयोजन व नियोजन एनसीसी युनिटचे प्रमुख लेफ्टनंट शरद रावे यांनी केले. या रॅलीच्या माध्यमातून शहरातील जनतेला 15 जानेवारी हा सेना दिवस म्हणून साजरा करतात याची जाणीव झाली.

## 'Army Day Rally' 15 January 2018

Army Day Rally was organized in SPM College on 15th January 2018. 15 January is celebrated as Army Day every year under the guidance of 13 Maharashtra Battalion NCC Khamgaon. This year, 13 Maharashtra Battalion NCC Khamgaon had asked to organize a rally on the occasion of Army Day. According to that instruction, the NCC unit of SPM College organized an army rally on the route from SPM College to Shri Chhatrapati Shivaji Maharaj Statue. All the faculty and non-teaching staff of the college as well as all the cadets of the NCC unit and other students of the college were also present for this rally. The principal of the college congratulated the students for this rally. The rally was organized and planned by the head of the NCC unit, Lt. Sharad Rave. Through this rally, the people of the city realized that January 15 is celebrated as Army Day.

# ‘पल्स पोलिओ अभियान’ 10 मार्च 2019

दिनांक 10 मार्च 2019 रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र चिखली व एसपीएम महाविद्यालयाचे एनसीसी युनिट यांनी पल्स पोलिओ अभियान यशस्वीरित्या राबविले. या दिवशी शहराच्या विविध ठिकाणी पल्स पोलिओ चे बूथ लावण्यात आले होते. या बुथवर व्यवस्था संभाळण्यासाठी महाविद्यालयाच्या एनसीसी युनिटचे 60 विद्यार्थी हे ड्युटी साठी हजर होते. प्राथमिक आरोग्य केंद्र चिखली येथील सहाय्यक श्री अनिल देशमुख यांच्या मार्गदर्शनातून या अभियानामध्ये एनसीसी कॅडेट्सने आपला सहभाग नोंदवला. सकाळी आठ ते संध्याकाळी पाच वाजेपर्यंत सर्व कॅडेट्सनी आपली ड्युटी चोखपणे बजावली. या अभियानांतर्गत शहरातील विविध भागातील घरोघरी जाऊन या अभियानाची माहिती जनतेला दिली व लहान मुलांना पल्स पोलिओ चे डोज देण्याचे आवाहन केले. या अभियानासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष व संस्थेचे सन्माननीय सचिव यांनी शुभेच्छा दिल्या. या अभियानासाठी शहरातील विविध बुथवर एनसीसी कॅडेट्सच्या ड्युट्या लावणे व त्या योग्य रीतीने पूर्ण करून घेण्याचे कार्य एनसीसी विभाग प्रमुख लेफ्टनंट शरद रावे यांनी केले.

# 'Pulse Polio Campaign' 10 March 2019

On March 10, 2019, Primary Health Center Chikhli and NCC Unit of SPM College successfully conducted Pulse Polio Campaign. On this day, Pulse Polio booths were set up at various places in the city. 60 students of NCC unit of the college were present for duty to manage the arrangement at this booth. NCC cadets participated in this campaign under the guidance of Mr. Anil Deshmukh, Assistant at Primary Health Center Chikhali. All the cadets performed their duty perfectly from 8 am to 5 pm. Under this campaign, people were informed about this campaign by going door to door in various parts of the city and urged to give pulse polio dose to children. The principal of the college as well as the honorable president of the institute and the honorable secretary of the institute extended their best wishes for this campaign. For this campaign, the duty of NCC cadets at various booths in the city and completing them properly was done by Lt. Sharad Rave, head of NCC department.